‖ वर्ष - 7 । अंक - 335 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

543
543
लोकसभा निकाल

| | |
|---|---|
| एनडीए | 294 |
| इंडिया | 232 |
| इतर | 17 |




# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 5 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## 2024 लोकसभा निवडणुकीत ‘काँटे की टक्कर’

# ‘एनडीए’ला सत्तेची ‘गॅरंटी’!

### चंद्राबाबू नायडू, नितीशकुमार ‘किंगमेकर’ : इंडिया आघाडीचे ‘कम बॅक’

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

लोकसभा निवडणुकीत देशात एनडीए आणि इंडिया आघाडीमध्ये काँटे की टक्कर पहायला मिळाली. एनडीए 296, तर इंडिया आघाडी 229 जागांवर आघाडीवर आहे. संपूर्ण देशभराची आकडेवारी पाहाली असता तब्बल 240 पेक्षा अधिक जगां भाजपने जिंकल्या आहेत. एनडीएच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केले. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी निवडणुक कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले तसेच देशवासियांचे आभार मानले आहेत. लोकसभा निकालानंतर इंडिया आघाडीकडून सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. विरोधकांनी एकजूट होऊनही जितक्या जागा जिंकल्या नाहीत तितक्या जागा भाजने एकट्याने जिंकल्या आहेत असं म्हणत PM मोदींचे INDIA आघाडीच्या नेत्यांचे तोंज बंद केले आहे. आंध्रप्रदेश, ओडिशा, सिक्कीमसह अनेक राज्यात काँग्रेसचा सापडासुप झाला आहे.



## उद्या इंडिया आघाडीची बैठक..!

सरकार स्थापन करणार का? असा सवाल जेव्हा राहुल गांधी यांना विचारला गेला तेव्हा आम्ही मित्रपक्षांशी चर्चा करून घेऊ. उद्या इंडिया आघाडीची बैठक आहे. त्यात जो निर्णय होईल, तसा निर्णय आम्ही घेऊ, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. दुसरीकडे, संध्याकाळी दिल्लीत I.N.D.I.A आघाडीची बैठकही बोलावण्यात आली आहे. या बैठकीत पुढील रणनीतीवर चर्चा होणार असल्याचे राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. निवडणूक आयोगाच्या वेबसाइटनुसार, रात्री 10 वाजेपर्यंत भाजपला 240, काँग्रेसला 99, सपाला 37, टीएमसीला 29, द्रमुकला 22, टीडीपीला 16, जेडीयूला 12, शिवसेना यूटीबीला 9, राष्ट्रवादी काँग्रेसला 7, आरजेडीला 4, लोक जनशक्ती पक्ष रामविलास 5 आणि शिवसेना शिंदे गटाला 7 जागा जागा मिळताना दिसत आहेत.काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी म्हणाल्या की, “किशोरी भैया, मला तुमच्या विजयाबद्दल अजिबात साशंकता नव्हती.

## संविधान वाचवण्यासाठी लढलो

आम्ही फक्त भाजपविरुद्ध लढलो नाही तर स्वतंत्र संस्थाविरोधी देखील लढलो, आम्ही संविधान वाचवण्यासाठी लढतो. संविधान वाचण्यासाठी संपूर्ण जनता एकत्र आली. भाजपकडून फोडाफोडीचं राजकारण केलं पण आम्ही एकत्र लढलो. मोदी आणि शहा यांनी यंत्रणांचा गैरवापर केला पण इंडिया आघाडीने देशाला नवा दृष्टीकोन दिलाय. मोदींचा पराभव म्हणजे अदानींचा पराभव. लोकशाही वाचवण्याचं काम देशातील सर्वात गरिब लोकांनी केलं आहे. लोकांनी या निकालामधून मोदी आणि शहा यांना संदेश दिला आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

## मोदींचा नितीश-नायडूंना फोन

18व्या लोकसभा निवडणुकीचे निकाल जवळपास स्पष्ट झाले आहेत. 542 जागांपैकी NDA ला 291 तर I.N.D.I.A ला 234 जागा मिळत आहेत. मात्र, भाजपला बहुमताचा 272 चा आकडा पार करता आला नसला तरी एनडीएला बहुमत मिळाले आहे. भाजपला 2014 मध्ये 278 तर 2019 मध्ये 303 जागा मिळाल्या होत्या. दरम्यान, सरकार स्थापनेची तयारी सुरू झाली आहे. एनडीए बुधवारी सरकार स्थापनेचा दावा करू शकतो. त्यांनी बुधवारी आपल्या घटक पक्षांची बैठक बोलावली आहे. पंतप्रधानांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि टीडीपी नेते चंद्राबाबू नायडू यांना भेटीसाठी बोलावले आहे. दुसरीकडे राष्ट्रपती भवनात शपथविधीची तयारी सुरू झाली आहे. ते 5 ते 9 जून पर्यंत सर्वसामान्यांसाठी बंद करण्यात आले आहे.

“ नरेंद्र मोदी, अमित शाह यांनी सीबीआय, ईडी, अर्धी न्यायव्यवस्था यांना धमकावले, ताब्यात घेतले. लढाई संविधान वाचवण्याची होती. आमची लढाई घटनात्मक संस्था वाचवण्यासाठी होती. जनता अदानीना मोदींशी रिलेट करते. मोदी गेले तर अदानी गेले. आज शेअर बाजारात हेच दिसून आले. गरीबांनी संविधान वाचवले.

- राहुल गांधी

## अमेठीत स्मृती इराणी पराभूत

उत्तर प्रदेशमध्ये भाजपाच्या वर्चस्वाला सुरुंग लावत इंडिया आघाडीने तब्बल ४५ जागांवर आघाडी प्राप्त केली आहे. अंतिम निकाल अद्याप हाती आले नसले तरीही या जागांवर इंडिया आघाडीचा विजय निश्चित होईल, असे चित्र आहे. उत्तर प्रदेशमधील ८० मतदारसंघांपैकी अमेठी आणि रायबरेलीतील निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे विशेष लक्ष होते. हे दोन्ही मतदारसंघ गांधी-नेहरु घराण्याचे पारंपारिक मतदारसंघ मानले जातात. अमेठीमधून यावेळी काँग्रेस नेते किशोरी लाल शर्मा यांना भाजपाच्या उमेदवार स्मृती इराणी यांच्याविरोधात उभे करण्यात आले होते. या मतदारसंघात त्यांचा विजय झाला असून काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी किशोरी लाल शर्मा यांचे कौतुक करणारे ट्विट केले आहे.

# पुण्यात महायुतीची विजयी ‘मुरली’!

## मोहोळ यांनी बाजी मारली : रविंद्र धंगेकर यांचा पराभव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील लक्षवेधी असलेल्या पुणे लोकसभा मतदारसंघाचा निकाल लागला असून त्या ठिकाणी भाजपच्या मुरलीधर मोहोळ यांनी बाजी मारली आहे. मोहोळ यांनी काँग्रेसच्या रवींद्र धंगेकरांचा पराभव केला आहे.**





राज्यातील सर्वाधिक लक्षवेधी मतदारसंघांपैकी एक असलेल्या पुण्याच्या निकालाकडे सर्वांचंच लक्ष लागले आहे. पुणे लोकसभेची निवडणूक यंदा चांगलीच चुरशीने झाल्याचं पाहायला मिळालं. भाजपकडून मुरलीधर मोहोळ तर काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर आणि वंचितकडून वसंत मोरे हे लोकसभेच्या रिंगणात होते. देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पुणे लोकसभा मतदारसंघात महायुतीचे भाजपचे मुरलीधर मोहोळ यांनी बाजी मारत इंडिया आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा पराभव केला. अनेक मुद्द्यांनी पुणे लोकसभा मतदार संघातील वातावरण प्रचारा दरम्यान तापले होते. त्यामुळे निकालाकडे पुणेकरांचे लक्ष लागले होते. आज मुरलीधर मोहोळ विजय घोषित होताच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष पुण्याच्या विविध भागात जल्लोष केला. भाजपकडून मुरलीधर मोहोळ यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी दिली गेली तर निवडणुकीत रंगत येणार असल्याची चर्चा सुरवातीपासून होती, आणि नेमके तसेच घडले. काँग्रेसने धंगेकर यांना उमेदवार म्हणून घोषित करताच पुण्याची निवडणूक रंगतदार होणार हे निश्चित झाले होते. दिवसागणिक प्रचारा दरम्यान दोन्ही बाजूंनी होणाऱ्या आरोप प्रत्यारोपांची, मुद्द्यांची चर्चा मतदारांमध्ये होत होती, त्यामुळे मतदार काय भूमिका घेणार हे उत्सुकतेचे होते. आजच्या निकालानंतर पुणेकरांनी मोहोळ यांना आपला खासदार म्हणून निवडले आहे.

### पुणे लोकसभा 2019 सालचा निकाल







| | | |
|---|---|---|
| गिरीश बापट (भाजप) | मोहन जोशी (काँग्रेस) | अनिल जाधव (वंचित) |
| 6,32,835 | 3,08,207 | 64,793 |

### अन् तिरंगी लढत रंगली...

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपचे गिरीश बापट हे विजयी झाले होते. त्यामुळे बापटांची जागा राखण्याचं आव्हान भाजपसमोर होतं. तर कसबा विधानसभा निवडणुकीत जो निकाल लागला त्याप्रमाणेच धक्कादायक निकाल देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता. म्हणूनच महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकर निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यांच्यासोबत मनसेतून वंचित बहुजन आघाडीमध्ये आलेल्या वसंत मोरेंनेही निवडणुकीच्या रिंगणात उतरून रंगत भरली.

# बारामतीमध्ये अजित पवारांच्या वर्चस्वाला धक्का!

## सुनेत्रा पवार यांचा पराभव : शरद पवार गटाची ऐतिहासिक कामगिरी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये कोण विजयी होणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. पुणे जिल्ह्यातील बारामती लोकसभा मतदार संघात दुरंगी लढत झाली. पवार कुटुंबातील ही लढत चुरशीची झाली. सुप्रिया सुळे एक लाखाहुन अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. अजित पवार यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार पराभूत झाल्या आहेत.**




पहिल्या फेरी पासूनच सुप्रिया सुळे यांनी आघाडी घेतली आहे. त्या 19 हजार मतांनी पुढे होत्या. विशेष म्हणजे अजित पवार यांच्या बारामती विधानसभा मतदार संघात सुप्रिया सुळे यांनी आघाडी घेतली आहे. पवार कुटुंबामध्ये झालेल्या या लढतीकडे (Baramati Lok Sabha Election)देशाचे लक्ष लागले होते. महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे तर महायुतीकडून सुनेत्रा पवार निवडणूक रिंगणात होत्या. नणंद-भावजय यांच्या या लढतीत प्रचार दरम्यान अनेक आरोप-प्रत्यारोप झाले होते. बारामती लोकसभा मतदार संघासाठी 7 मे रोजी मतदान झाले होते. बारामती लोकसभा मतदारसंघाकडे यंदा देशाचे लक्ष होते. आतापर्यंत बारामतीमध्ये पवार कुटुंबियांचे वर्चस्व राहिले आहे .शरद पवार बारामती लोकसभा मतदारसंघातून 6 वेळा खासदार झाले होते. त्यांची कन्या सुप्रिया सुळे या 3 वेळा खासदार झाल्या असून याही वेळी त्या बारामती लोकसभा मतदार संघातून एक लाखाहुन अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. रोहित पवार म्हणाले, लोकसभा निकालानंतर आता अजित पवार एकटेच राहतील. बाकी 12 ते 13 जण भाजपसोबत जातील आणि उर्वरित आमदार आमच्या सोबत येतील तर सुनील तटकरे धनंजय मुंडे हे तुम्हाला भाजपमध्ये जाताना दिसतील.पहिल्या फेरी पासूनच सुप्रिया सुळे यांनी आघाडी घेतली आहे. त्या 19 हजार मतांनी पुढे होत्या. विशेष म्हणजे अजित पवार यांच्या बारामती विधानसभा मतदार संघात सुप्रिया सुळे यांनी आघाडी घेतली आहे. पवार कुटुंबामध्ये झालेल्या या लढतीकडे देशाचे लक्ष लागले होते.

### टीका केली त्यांना घेऊ नये : रोहित पवार

अजित पवारांनी घरवापसी केली तर तुम्ही काय निर्णय घेणार याविषयी बोलताना रोहित पवार म्हणाले, जर ते येणार असतील तर मी पक्ष सोडेल असं मी म्हणालो नाही. पण माझी वेगळी भूमिका असेल हे मात्र मी म्हणालो आहे. त्यामुळे शरद पवारांवर ज्यांनी टीका केली त्यांना घेऊ नये. मला बच्चा म्हणाले मात्र आता मी मोठा झालोय हे त्यांना कळालं असेल.

### अनेक लोकांच्या झोपा आता उडाल्या

रोहित पवार म्हणाले, आम्हाला नेता बनण्याची घाई झाली नाही. भाजपने खाली राजकारण नेलं होतं. ते पुन्हा एक व्यवस्थित करायचं आहे. जेव्हा अनेक नेते धमक्या देत होतें त्यावेळी आम्ही म्हणत होतो की जनता हे सर्व काही बघत आहे. अनेक लोकांच्या झोपा आता उडाल्या आहेत. महाराष्ट्राला पुन्हा एक नंबरच राज्य करायचे आहे. वंचित आमच्यासोबत आले असते तर नक्की आणखी वेगळं चित्र पाहिला मिळालं असतं.

# मावळमध्ये श्रीरंग बारणे यांची 'हॅट्ट्रिक'!

## महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे पराभूत : पिंपरी, चिंचवड अन् पनवेलमधून मताधिक्य

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार आणि शिवसेनेचे खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी विजयाची हॅट्रिक साधली आहे. त्यामुळे ते तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत संसदेत प्रवेश करणार आहेत. श्रीरंग बारणे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार आणि ठाकरे गटाचे संजोग वाघेरे-पाटील यांचा ९६ हजार ६१५ मतांनी पराभव केला.**



खासदार श्रीरंग बारणे आणि संजोग वाघेरे यांच्यात सरळ लढत झाली होती. मंगळवारी सकाळी 8 वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. पहिल्या फेरीपासूनच बारणे यांनी आघाडी घेतली ती शेवटपर्यंत कायम होती. श्रीरंग बारणे यांना ६ लाख ९२ हजार ८३२ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी संजोग वाघेरे-पाटील यांना ५ लाख ९६ हजार २१७ मते मिळाली. विजय दृष्टिपथात असल्याचा अंदाज आल्यानंतर श्रीरंग बारणे त्यांच्या समर्थकांसह बालेवाडी येथील मतमोजणी केंद्रावर आले. तेव्हा त्यांच्या समर्थकांनी मोठा जल्लोष करत घोषणाबाजी केली. महायुतीचा विजय असो, झाली रे झाली हॅट्रिक झाली, घासून नाही ठासून आलो अशा घोषणा समर्थकांनी दिल्या. महायुतीचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी गुलाल उधळत, फटाके वाजवत आनंद व्यक्त केला.

### महायुतीचे कार्यकर्ते, नेत्यांना श्रेय

विजयानंतर खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रतिक्रिया देताना म्हणाले की, मावळच्या जनतेने तिसऱ्यांदा माझ्यावर विश्वास टाकला आहे. मावळमधील सहाही आमदार, कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम केले. त्यांच्या मेहनतीचा विजय आहे. दहा वर्षे मतदारसंघात नागरिकांशी एकरूप राहून काम केले. जनतेने माझ्यावर मोठा विश्वास टाकला आहे. त्यांचे आभार मानतो. मतदारांना, महायुतीचे कार्यकर्ते, नेत्यांना विजयाचे श्रेय देतो.

मावळ लोकसभेच्या कुरुक्षेत्रात ३३ उमेदवार होते तरी खरी लढत महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे ठाकरे गटाचे संजोग वाघेरे-पाटील यांच्यात होती. मावळ लोकसभा मतदारसंघात एकूण ६ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यातील दोन भाजपचे आमदार आणि एक भाजप समर्थक आमदार आहे. दोन राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आहेत. तर एक शिवसेनेचा आमदार आहे. केवळ एक आमदार असलेल्या मतदारसंघात शिवसेनेला उमेदवारी मिळाल्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये छुप्या नाराजीची चर्चा होती. एवढेच कशाला तर मतदानानंतर बारणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर नाराजी व्यक्त केली होती. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी प्रचार केला नसल्याची खदखद व्यक्त करून त्या नेत्यांची नावे अजित पवारांनी दिल्याचे ते बोलले होते.

# शिरुरमध्ये वाजली 'तुतारी'; अमोल कोल्हे कारभारी!

## राष्ट्रवादी अन् घड्याळाची पिछेहाट : शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव

। शिरुर ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील हायव्होल्टेज मतदारसंघांमध्ये समावेश असलेल्या शिरुर लोकसभा मतदारसंघात शरद पवार गटाच्या अमोल कोल्हे यांनी अजितदादा गटाच्या शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच अमोल कोल्हे यांनी आघाडी घेतली होती. एकदाही शिवाजीराव आढळराव पाटील यांना एकाही फेरीत आघाडी घेता आली नाहीत. अखेर अमोल कोल्हे यांनी तब्बल 70 हजारांच्या मताधिक्याने शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला.**




अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात प्रचाराच्या काळात तुफान वाकयुद्ध रंगले होते. शिवाजीराव आढळराव पाटलांचा वार आणि अमोल कोल्हेंचा शाब्दिक प्रतिवार यामुळे शिरुरचा प्रचार रंगतदार झाला होता. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात चुरशीची लढत असलेल्या मतदारसंघांमध्ये शिरुरचा समावेश आहे. शिरुर लोकसभा मतदारसंघात शरद पवार गटाचे अमोल कोल्हे यांच्याविरुद्ध अजितदादा गटाचे शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात सामना रंगला होता. गेल्या निवडणुकीत अमोल कोल्हे हे आढळराव पाटलांचा पराभव करत जायंट किलर ठरले होते.

### अजित पवार यांचा उमेदवार पराभूत

शिरूर लोकसभा मतदार संघ पुणे शहर, पुणे ग्रामीण आणि पिंपरी चिंचवड भाग येतो. यामध्ये सहा विधानसभा मतदारसंघ येतात. जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरुर, भोसरी आणि हडपसर आदी विधानसभा मतदारसंघ या लोकसभा मतदारसंघात येतात. 2019 मध्ये अमोल कोल्हे विजयी झाले होते. त्यांना 6,35,830 मते मिळाली होती तर शिवाजीराव आढळराव पाटील यांना 5,77,347 मते मिळाली होती. 2014 मध्ये शिवाजीराव आढळराव पाटील 6,43,415 मते घेऊन विजयी झाले होते. त्यावेळी त्यांनी दत्तात्रय निकम यांना पराभूत केले होते. निकम यांना 3,41,601 मते मिळाली होती.

यंदाही त्यांना या कामगिरीची पुनरावृत्ती करता येणार का, याकडे नजरा लागल्या होत्या. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे (MP Amol Kolhe) आहेत. त्यांच्या विरोधात शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील (ncp shivajirao adhalrao patil) रिंगणात आहे. परंतु आढळराव पाटील शिवसेनेकडून न लढता अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून लढत आहे. त्यासाठी त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. यामुळे शिरुरमध्ये अमोल कोल्हे आणि आढळराव पाटील अशी दुरंगीच लढत झाली.




**सत्ताधारी भाजपला मोठा धक्का बसला आहे. अब की बार ४०० पार असा नारा देत निवडणूक लढविणाऱ्या भाजपच्या विजयाचे वारु इंडिया आघाडीने रोखले आहे. असे असले तरी इंडिया आघाडीलाही बहुमताचा मॅजिक आकडा गाठता आलेला नाही, त्यामुळे केंद्रात आता ज्यांना सत्ता स्थापन करण्याची मनिषा आहे त्यांना इतर घटकपक्षांसमोर हात पसरण्याची आणि ढूंढो ढूंढो रे साजना..... म्हणण्याची वेळ आली आहे.**

# भाजप - इंडिया आघाडीचे ढूंढो ढूंढो रे



राजकारणातील चाणक्य म्हणून ओळख असणाऱ्या अमित शहा, नरेंद्र मोदी या जोडीला सर्वात मोठा धक्का बसला आहे. काश्मीरमधील कलम ३७० असो किंवा अयोध्येतील राम मंदिर असो हे दोन ऐतिहासिक निर्णय मोदी-शहा या जोडीने घेतले. परंतु हे दोन्ही मुद्दे भाजपला कॅश करता आले नाहीत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची फायरब्रँड नेते म्हणून देशभर प्रतिमा आहे. परंतु योगी आदित्यनाथ यांच्या प्रतिभेवर राहुल गांधी आणि अखिलेश यादव हे भारी पडल्याचे दिसून आले आहे. मायावती यांच्या बहुजन समाज पक्षाला या निवडणुकीत सपशेल अपयश आले आहे. समाजवादी पक्ष आणि काँग्रेस आघाडीच्या मतांमध्ये फूट पडण्यात मायावतींना अपयश आले, त्याचा थेट फटका भाजपला बसला. त्याचबरोबर राज्यातील मुस्लीम मतदारांनीही काँग्रेस-सपा युतीच्या बाजूने कौल दिल्याचे स्पष्ट झाले. त्याचाही भाजपला फटका बसला. महाराष्ट्रात शिवसेनेतील एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार पक्षाशी भाजपची महायुती होती. भाजपाने यंदा ४८ पैकी २८ जागा लढविल्या होत्या. मागील निवडणुकीपेक्षा तीन जागा जास्त लढवूनही भाजपाला अपेक्षित यश मिळणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर झालेली ही पहिलीच मोठी निवडणूक होती. या निवडणुकीत मतदारांचा पाठिंबा हा उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना असल्याचे एकंदरीत निकालावरुन स्पष्ट झाले. मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतर तयार झालेल्या जातीय समीकरणाचाही भाजपला फटका बसल्याचे स्पष्ट झाले. त्याचबरोबर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना आपल्या पक्षाची पारंपरिक मते भाजपकडे वळवण्यात अपयश आले,देखील भाजपाला भोवली. २०१४ आणि २०१९ मधील निवडणुकीत मोदी लाटेत भाजपाचे खासदार निवडून आले. या निवडणुकीत मात्र ही लाट महाराष्ट्रात ओसरली. यावेळी खासदारांची प्रतिमा, त्यांचे मतदारसंघातील काम याचा कस लागला. त्यात भाजपचे विद्यमान खासदार अपयशी ठरले. भाजपला दुसरा मोठा फटका हा पश्चिम बंगालमध्ये बसला आहे. ममता बॅनर्जी यांनी सीएएच्या मुद्द्यावर भाजपविरोधात प्रचार केला होता. त्यामुळे मुस्लिम समुदाय तृणमूलच्या बाजूने गेल्याचे दिसून आले आहे. त्याचाच मोठा फटका भाजपला बसला आहे. भाजपला उत्तर प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, कर्नाटक आणि हरियाणात मोठा फटका बसला आहे. रात्री उशीरापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार, उत्तर प्रदेशातील ८० जागांपैकी केवळ ३५ जागांवर भाजपला विजय मिळताना दिसत आहे. उत्तर प्रदेशात राम मंदिर उभारल्यानंतर मोदी सरकारला मोठा फायदा होईल असे चित्र होते. पण भाजपचा हा बालेकिल्लाच ढासळला आहे. उत्तर प्रदेश या देशात सर्वाधिक लोकसभा मतदारसंघ (८०) असलेल्या राज्यात मोठा उलटफेर पाहायला मिळण्याची शक्यता आहे. ५४३ पैकी ८० खासदार एकट्या उत्तर प्रदेशमधून येतात. त्यातही बहुमताचे संख्याबळ २७२ इतके आहे. त्यामुळे देशात सत्तास्थापनेसाठी उत्तर प्रदेशला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. त्याचबरोबर देशाच्या आजवरच्या इतिहासात उत्तर प्रदेशने सर्वाधिक पंतप्रधान दिले आहेत. उत्तर प्रदेशमध्ये यंदादेखील भाजपचे वर्चस्व असेल असा दावा अनेक एक्झिट पोल्समध्ये करण्यात आला होता. मात्र आतापर्यंत हाती आलेले निकाल हे एक्झिट पोलमधील अंदाजापेक्षा वेगळे आहेत. हरियाणात भाजपला अवघ्या चार जागा तर काँग्रेसला ६ जागा मिळताना दिसत आहेत. हरियाणा हा सुद्धा भाजपचा बालेकिल्ला आहे. मात्र, पंजाब आणि हरियाणाच्या शेतकऱ्यांचे आंदोलन आणि सोयबीनच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे भाजपला भोवल्याचे दिसून येत आहे. पंजाबमध्ये तर भाजपला खातेही उघडता आले.

## प्रासंगिक »

# कौलापर्यंत

***'इंडिया' आघाडीची निराशा फक्त महाराष्ट्रात टळेल असे मतदानोत्तर पाहण्यांतून दिसते..***

मतदानोत्तर चाचण्या ज्या माध्यमगृहांनी केल्या त्यातील बहुतेक माध्यमगृहांचा राजकीय कलही उघड होता. त्यामुळे जे काही घडले त्यास आक्रीत म्हणता येणार नाही. यात माध्यमगृहांस बोल लावण्याची गरज नाही. सत्ताधीशांच्या वळचणीस लवकरात लवकर पोहोचणे हीच स्पर्धा असताना त्यापेक्षा वेगळे काही कोणाकडून होण्याची अपेक्षाही ठेवण्याची आवश्यकता नाही. या निमित्ताने मतदानोत्तर चाचण्यांची विश्वासार्हता या मुद्द्याची चर्चा करण्याची उबळ अनेकांस येईल. तसे करणेही अंतिमत: निरुपयोगी ठरेल.देखील कोणाकोणाची तपासणार? आणि मुख्य म्हणजे कोण? निवडणूक आयोग, विविध स्वायत्त संस्था, नियामक यंत्रणा अशा कित्येकांचा समावेश यात करावा लागेल आणि परिस्थिती अशी की तसे करू गेल्यास ही जबाबदारी पार पाडणार कोण असाही प्रश्न पडू शकेल. तथापि त्याची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे!

दरवर्षी जगभर ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे. सृष्टी हे सजीव व निर्जिव वस्तुचे मिश्रण आहे, झाडे ही जीवन आहे. सृष्टीकर्त्याने जीवनाचे मिश्रण अशा प्रकारे केले आहे.

# वृक्ष तोडाल तर माणसं कोसळतील

जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर-सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी यादिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो. आजच्या दिवशी म्हणजेच ५ जून रोजी जगभर पर्यावरण दिवस अगदी थाटामाटाने साजरा केला जातो. त्यादिवशी पुढील



जीवनातील परिस्तिथी किती बिकट होईल ते पाहता त्यासाठी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी उपक्रम करून भाषणे करून, झाडे लावा उपक्रम राबवून पुढील धोका टाळण्याचे आज कार्य केले जाते. यासर्वांतूनच या दिवसाची जागरूकता निर्माण होते. आपल्या मातेसमान पृथ्वी आहे आणि तिच्या पर्यावरणाची काळजी सर्वानी घ्यावी. जवळपास पाच दशकांपासून जागतिक पर्यावरण दिन जागरूकता वाढवत आहे, कृतीला समर्थन देत आहे आणि पर्यावरणासाठी बदल घडवून आणत आहे. जागतिक पर्यावरण दिनाची थीम "ग्रीन सिटीज" होती आणि घोषणा होती "प्लॅन्ट फॉर द प्लॅनेट!" २००५ ला साध्य केली. विषय वाळवंट आणि वाळवंटीकरण होता आणि "वाळवंटात कोरडवाहू नको" असे घोषवाक्य होते. २०११ च्या जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन भारताने केले होते. दिवसाचे यजमानपद भूषवण्याची भारताची ही पहिली वेळ होती. २०११ ची थीम 'फॉरेस्ट्स - नेचर अॅट युवर सर्व्हिस' होती. समुद्र किनारा स्वच्छता, मैफिली, प्रदर्शने, चित्रपट महोत्सव, सामुदायिक कार्यक्रम, वृक्षारोपण आणि बरेच काही यासह जगभरात हजारो उपक्रम आयोजित केले गेले. भारतात नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यासाठी आणि पर्यावरणासाठी जनजागृती करण्यासाठी कदंबचे रोपटे लावले. भारत येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम २०१८ ची थीम "बीट प्लास्टिक पोल्युशन" होती. यजमान राष्ट्र भारत होता. ही थीम निवडून, प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा भार कमी करण्यासाठी लोक त्यांचे दैनंदिन जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाविकास आघाडीची दमदार कामगिरी!

## महाराष्ट्रात महायुती 18 तर महाविकास आघाडीला 29 जागांवर आघाडी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर-मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसने मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात येथे मतदान पार पडणार असून उद्यापासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. याच पार्श्वभूमीवर वर्षा गायकवाड यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी भेट घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडी एकजुटाने लढत असून नक्कीच विजयी होईल, असा ठाम विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.**


वर्षाताईंना खासदार करून दिल्लीला पाठवणार आहे. देशामध्ये हुकुमशाही येता कामा नये. घटनेचे रक्षण झाले पाहिजे आणि घटना बदलता कामा नये. यासाठी महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडी एकजुटाने लढत असून नक्कीच विजयी होईल, असा विश्वास व्यक्त करत उद्धव ठाकरे यांनी हा माझ्या घरचा मतदारसंघ असून माझेही मत वर्षाताईंनाच असणार असल्याचे म्हटले. वर्षाताई मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा असून त्या कुठूनही लढू शकतात आणि जिंकू शकतात, असेही उद्धव ठाकरे पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले. तसेच उत्तर मुंबईची उमेदवारीही लवकरच जाहीर केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पहिल्यांदाच पंजाला मतदान करणार आहात, या प्रश्नाचेही उद्धव ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिले. पंजाला पहिल्यांदा मतदान करत असलो तरी त्या हातात मशाल आहे. त्याचा एकत्रित परिणाम होईल आणि त्यानंतर आम्ही तुतारी फुंकणार आहोत, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच सांगलीची जागाही आम्ही जिंकणार असा विश्वासही उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. फडणवीसांच्या आरोपांवर विचारले असता उद्धव ठाकरे यांनी त्याबाबत संजय राऊत बोलले असून नाना पटोले यांनीही भाष्य केल्याचे म्हटले. चावीचे खेळणे असते आणि त्याला चावी दिली की ती संपेपर्यंत बोलावे लागते असे पटोले म्हणाले होते. संजय राऊतही त्यावर बोलले असून आज काही वृत्तपत्रात लेखही आलेले आहेत. गेल्या 2-3 दिवसांमध्ये क्लीन चिट देण्यात आलेल्या आहेत. 70 हजार कोटींचा घोटाळा, शिखर बँक घोटाळा याबाबत कालपर्यंत ज्यांच्यावर तुम्ही आरोप करत होता ते लोक तुमच्याकडे आल्यावर क्लीन चिट कशी मिळाली याचे उत्तर जनतेला द्यावे लागणार आहे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. दरम्यान, उत्तर-मध्य मुंबईत हा माझ्यासाठी नवखा मतदारसंघ नाही. मी गेल्या 10 महिन्यापासून या मतदारसंघात आहे. फक्त हा मतदारसंघच नाही तर मुंबईतील सर्व सहाच्या सहा जागा महाविकास आघाडीच्या निवडून आणण्याचा प्रयत्न असून 2004 ची पुनरावृत्ती होईल, असा विश्वास वर्षा गायकवाड यांनी व्यक्त केला.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी भेट घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडी एकजुटाने लढत असून नक्कीच विजयी होईल, असा ठाम विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.



### मुंबईकरांनी आसमान दाखवले!!

लोकसभा निवडणुकीचे निकाल आता जवळपास स्पष्ट झाले असून महाराष्ट्रात महाविकास आघाडीने महायुतीला जोरका झटका दिला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडल्यानंतरही महायुतीचे 20 चा आकडा गाठतानाही दमछाक झाली आहे. मुंबईमध्येही भाजप-मिंधे गटाला दारूण पराभवाचा सामना करावा लागला आहे. मुंबईतील सहा पैकी 5 मतदारसंघात भाजप-मिंधे गटाचा पराभव झाला. चार मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा भगवा फडका, तर प्रत्येकी एका जागेवर भाजप आणि काँग्रेसने विजय मिळवला. विशेष म्हणजे मुंबईमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी रस्त्यावर उतरूनही मुंबईकरांनी भाजपला आसामान दाखवले आणि इथे आवाज शिवसेनेचाच असणार हे स्पष्ट झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाटकोपरमध्ये मिहीर कोटेचा यांच्यासाठी रोड शो घेतला होता. घाटकोपरमध्ये होर्डिंग पडून दुर्घटना झाली त्याच्या बाजुलाच मोदींनी रोड शो घेतला. यावेळी मेट्रो सेवाही बंद करण्यात आली होती. त्यामुळे चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले. हा सर्व रोष मतपेटीतून व्यक्त झाला. त्यानंतर छत्रपती शिवाजी पार्कावरही महायुतीची समारोपाची सभा झाली.



### मराठवाड्यात भाजपचा सुपडा साफ

सर्व आठ जागा जिंकण्याच्या वल्गना करणाऱ्या भाजपचे नाकच मराठवाड्याने कापले. भाजपचे दिग्गज नेते आणि केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीस पंकजा मुंडे तसेच विद्यमान खासदार प्रताप पाटील चिखलीकर, सुधाकर श्रृंगारे यांचा दारुण पराभव झाला. शिवसेनेचे संजय जाधव, ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि नागेश पाटील आष्टीकर यांनी विजयाचा गुलाल उधळला. छत्रपती संभाजीनगरमध्ये मिंधे गटाचे संदिपान भुमरे यांनी एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांचा पराभव केला. मराठवाड्यातील आठ जागांच्या निकालांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. परभणीत शिवसेनेचे संजय जाधव यांनी महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांना जबरदस्त धोबीपछाड दिली. येथे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तिकीट कापून देवेंद्र फडणवीसांच्या हट्टाखातर जानकरांना संधी देण्यात आली. मात्र सुरुवातीपासूनच संजय जाधव यांनी प्रचारात आघाडी घेतल्याने त्यांचा विजय निश्चित समजला जात होता. संजय जाधव यांनी जवळपास दीड लाखांच्या फरकाने जानकर यांचा पराभव केला.

### मोदींच्या वांझोट्या सभा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्यात लातूर, नांदेड, परभणी, धाराशिवात सभा घेतल्या. पण या ठिकाणी मतदारांनी महायुतीला साफ झिडकारले. लातूरात सुधाकर श्रृंगारे, धाराशिवमध्ये अर्चना पाटील, परभणीत महादेव जानकर, नांदेडात प्रताप पाटील चिखलीकर यांना मत म्हणजे मोदीला मत असे आवाहन करूनही मतदारांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत भाजपवर जोरदार टीका केली. यावेळी शिवसेनेला नकली बोलणाऱ्या भाजपवर उद्धव ठाकरे यांनी जोरदार घणाघात केला. "राज्यात आता मशालने आग लावली आहे. आता यांना असली आणि नकलीचा फरक कळेल. मला नकली संतान बोलतात. ते आपल्या आईला मानायला तयार नाही. मला परमात्माने पाठवले बोलतात", असा टोला त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लगावला. लोकसभा निवडणूकीच्या निकालावर प्रतिक्रीया देताना उद्धव ठाकरे म्हणाले, "आपल्या देशात सर्व सामान्य माणसांनी त्यांची ताकद काय असते ते दाखवून दिले आहे. सत्ताधारी किती मस्तवाल झाले तरी एका बोटाने आपण त्यांना रोखू शकतो. त्यांचा उधळलेला वारू रोखू शकतो हे देशातील जनतेने साऱ्या जगाला दाखवून दिलं आहे"

# नरेंद्र मोदी पंतप्रधान नाहीच!

## डॉ. खलिद अनवर यांच्या वक्तव्याने खळबळ

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकीचे निकाल हाती आले आहेत. जनतेने एनडीएला कौल दिला असून बहुमताचा आकडा पार केला आहे. भाजपाला युपीतून मोठा पाठिंबा मिळत आलेला आहे. मात्र, यावर्षी जनतेने भाजपाला सपशेल नाकारले आहे. तसेच महाराष्ट्रातही मोठा फटका बसला आहे. परंतु, बिहारमध्ये नितीश कुमारांसोबत युती करून भाजपाला फायदा झाला असून दोघांच्याही जागा कायम आहेत.**




बिहारमध्ये लोकसभेच्या एकूण ४० जागा आहेत. भाजपाला १२ जागा, तर जनता दल युनायटेडला १२ जागा मिळाल्या आहेत; तर राष्ट्रीय जनता दल ४ जागा आणि काँग्रेसला ३ जागा मिळाल्या आहेत. बिहारमध्ये एनडीएचा वरचष्मा आहे. भाजपासोबत नितीश कुमारांचा जदयू पक्ष असला तरी एनडीएमध्ये शेवटपर्यंत सोबत असणे महत्त्वाचे आहे. कारण नितीश कुमार यांनी अनेकदा पलटी मारलेली आहे. एकटा भाजपा बहुमतापासून लांब आहे. अशात नितीश कुमार यांनी साथ सोडली तर भाजपाचे तिसऱ्यांदा सत्ता स्थापनेचे स्वप्न भंग होऊ शकते. लोकसभा निवडणुकीचे अंतिम निकाल येत असतानाच बिहारमधील जदयू आमदाराने केलेल्या वक्तव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. जदयू नेता आमदार डॉ. खलिद अनवर म्हणाले, "पंतप्रधान पदासाठी नितीश कुमार यांच्यापेक्षा चांगला उमेदवार कोणीच असू शकत नाही." डॉ. खलिद अनवर यांच्या या विधानाने भाजपाच्या मनात धडकी भरली आहे. तसेच नितीश कुमार यांच्या मनात नक्की काय आहे, यावरही चर्चा सुरू झाली आहे. जेडीयू एमएलसी डॉ. खालिद अन्वर यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे कौतुक केले आणि ते म्हणाले की, ते एक अनुभवी नेते आहेत जे देश आणि समाज चांगल्या प्रकारे समजून घेतात. देशाला समजून घेणारा त्यांच्यासारखा नेता नाही. याशिवाय नितीशकुमार हे सर्व लोकशाही संस्थांचा आदर करतात. मात्र, जेडीयू सध्या एनडीएचा भाग आहे. ते पुढे म्हणाले की, "लोकांना नितीश कुमार यांना देशाचे पंतप्रधान बनवायचे आहे. आजच्या निवडणूक निकालांनी लोकांमध्ये आशेचा किरण जागवला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी ज्या पद्धतीने बिहारचा विकास केला. त्यांनी रेल्वेमंत्री असताना केलेली कामे आजही स्मरणात आहेत." दरम्यान, लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर देशातील राजकीय घडामोडी बदलत असल्याचे चित्र आहे. भाजपाला गेल्या दहा वर्षांत पहिल्यांदा बहुमतापेक्षा कमी आकडा मिळाला आहे. भाजपाला स्वबळावर बहुमत मिळालं नाही तर नितीश कुमार यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. तर दुसरीकडे एनडीच्या नेत्यांनी उद्या दिल्लीत बैठकीचं आयोजन केलं आहे.इंडिया आघाडीतील सर्व पक्ष मिळून एकूण जागांवर आघाडीवर मिळवली, त्यापेक्षा अधिक जागा एकट्या भाजपाच्या वाट्याला आल्या आहेत. या दणणीत विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. देशाच्या नागरिकांनी एनडीएवर सतत तिसऱ्यांदा विश्वास दाखवला. भारताच्या इतिहासातला हा ऐतिहासिक विजयाचा क्षण आहे. मी या स्नेह आणि आशीर्वादासाठी आपल्या कुटुंबासमोर नतमस्तर होतो. मी देशातील नागरिकांना शब्द देतो की त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आम्ही नेहमी नवी ऊर्जा, नवीन संकल्पाना घेऊन पुढे येऊ."

### मोदींनी विश्वासार्हता गमावलीय; ममता

देशाच्या राजकारणासाठी आजचा दिवस हा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकसभा निवडणूकीचा निकाल समोर येत आहे. लोकसभा निवडणूकीत एनडीए आणि इंडियामध्ये चुरशीची लढत दिसून येत आहे. यंदा काँग्रेसनी अनेक जागांवर बाजी मारल्याने भाजपला बहुमताचा आकडा मिळाला नाही. निवडणुकीच्या निकालावर देशभरातून अनेक मोठ्या नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निवडणूकीच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहेत. त्या म्हणाल्या, "आम्हाला आनंद आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बहुमताचा आकडा मिळाला नाही. पंतप्रधान मोदींनी विश्वासार्हता गमावली आहे. त्यामुळे त्यांनी लगेच राजीनामा द्यायला पाहिजे कारण यावेळी ४०० जागांचा आकडा पार करणार असल्याचे सांगितले होते.एवढा पैसा खर्च करूनही मोदीजी आणि अमित शहा यांचा हा अहंकारामुळे इंडिया गट जिंकला आणि मोदी हरले. ते अयोध्यातही हरले

# आंध्र प्रदेशात टीडीपी अन् भाजपाला बहुमत

## आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डींनी दिला राजीनामा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीचे निकाल जवळपास हाती आले असून, याबरोबरच आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीचा निकालही लागला आहे. राज्यात भाजपा आणि एनडीएसाठी चांगली बातमी आहे. आंध्र प्रदेश विधानसभा निवडणूक २०२४ चे निकाल टीडीपीच्या बाजूने लागताना दिसत आहेत. सर्व १७५ विधानसभा जागांवर कल आणि निकाल समोर येत आहेत.**

चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम पक्षाने (TDP) जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेस पक्षाला (YSRCP) खूप मागे सोडले आहे. टीडीपी पक्षाने ८८ जागांची विजयी आघाडी घेतली आहे. अशा स्थितीत आंध्र प्रदेशात सत्ता परिवर्तन निश्चित मानले जात आहे. आंध्र प्रदेशात विधानसभेच्या १७५ जागा आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी ८८ आमदारांची गरज आहे. राज्यात भाजपाने चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसम पार्टी (TDP) आणि अभिनेता पवन कल्याण यांच्या जनसेना पक्ष (JSP)बरोबर युती केली आहे. टीडीपीला १३५ हून अधिक जागांवर आघाडी असून, जेएनपीला २१ तर भाजपाला आठ जागांवर विजयी आघाडी मिळाली



आहे. YSRCP ला फक्त ११ जागा जिंकता आलेल्या आहेत. तर काँग्रेससह अन्य पक्षांचे खातेही उघडले नाही. टीडीपीने ६३, जनसेना पक्षाने १३ तर भाजपने चार जागा जिंकल्या आहेत. तर वायएसआरसीपीने तीन जागा जिंकल्या आहेत.विशेष म्हणजे वायएस जगनमोहन रेड्डी यांनी आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचे पत्र राज्यपालांना पाठवले आहे. आंध्र प्रदेशात विधानसभेच्या १७५ जागांसाठी चुरशीची लढत आहे. इकडे बहुमत मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला ८८ जागा जिंकाव्या लागतात. एका बाजूला सीएम जगनमोहन रेड्डी आहेत, ज्यांच्या सरकारने ३० मे रोजी पाच वर्षे पूर्ण केली आहेत, तर दुसऱ्या बाजूला टीडीपी-भाजपा युती आहे, ज्यांनी ही निवडणूक जिंकली आहे. निवडणुकीपूर्वी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि तेलुगु देसम पक्षाचे (TDP) नेते चंद्राबाबू नायडू यांनी भाजपEच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (NDA) पुनरागमन केले होते.

### पुन्हा एनडीएमध्ये सामील

२०१९ मध्ये YSR काँग्रेस पक्षा (YSRCP) ने प्रचंड बहुमताने निवडणुका जिंकल्या होत्या, १७५ पैकी १५१ जागा जिंकल्या होत्या, तर विद्यमान तेलुगू देसम पार्टी (TDP) ने २३ जागा जिंकल्या होत्या. जनसेना पक्षने एका जागेसह विधानसभेत प्रवेश केला, तर काँग्रेसला एक जागाही जिंकता आलेली नाही. त्यानंतर जगनमोहन रेड्डी यांना आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री करण्यात आले. यावेळी चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखाली तेलुगू देसम, भाजपा आणि पवन कल्याण यांच्या जनसेना पक्षाची युती आहे. वाय. एस. शर्मिला यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा उदयास आलेल्या काँग्रेसने यावेळी डाव्या पक्षांशी हातमिळवणी केल्याने निवडणूक त्रिशंकू झाली आहे.

# गोळीबारानंतर पहिल्यांदाच बाहेर पडला सलमान खान

घरावर झालेल्या गोळीबारानंतर सध्या बॉलीवूड अभिनेता सलमान खान चांगलाच चर्चेत आला आहे. रविवारी (१४ एप्रिल ) पहाटे पाच वाजताच्या सुमारास सलमानच्या घरावर दोन अज्ञात व्यक्तींनी दुचाकीवरून येत गोळीबार केला. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अनेक मोठमोठ्या सेलिब्रिटींनी येऊन सलमानची भेट घेतली. तसेच त्याची भेट घेण्यासाठी काही राजकीय नेते सुद्धा भाईजानच्या निवासस्थानी दाखल झाले होते. गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर सध्या मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे. अशातच सोमवारी सायंकाळी गोळीबाराच्या घटनेनंतर सलमान खान पहिल्यांदाच घराबाहेर आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अभिनेता आलिशान गाडीतून गॅलेक्सी अपार्टमेंट बाहेर पडला. तसेच सलमानच्या गाडीच्या मागे-पुढे मुंबई पोलिसांचा ताफा पाहायला मिळाला. वरिंदर चावलाच्या पापाराझी इन्स्टाग्राम पेजवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.

सलमान घराबाहेर पडताना त्याच्याबरोबर निर्मिती रमेश तौरानी सुद्धा उपस्थित होते. अभिनेत्याला पोलिसांच्या मोठ्या सुरक्षेखाली घराबाहेर नेण्यात आलं. आता भाईजान पुन्हा शूटिंग सेटवर केव्हा परतणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. या सगळ्या प्रकरणावर आता खान कुटुंबीयांकडून अधिकृत निवेदन जारी करण्यात आलं आहे. सलमानचा भाऊ अरबाजने यासंदर्भात पोस्ट शेअर केली आहे.

# सुहाना अन् अनन्या पांडेचा जुना फोटो व्हायरल

आयपीएलचा प्रत्येक सामना सध्या रंगतदार होत असल्याचं पाहायला मिळत आहे. अनेक मोठमोठे बॉलीवूड सेलिब्रिटी या सामन्यांना आवर्जुन उपस्थिती लावतात. आयपीएलमधील कोलकाता नाइट रायडर्स (KKR) ही बॉलीवूड अभिनेता शाहरुख खानची टीम आहे हे आता सर्वश्रुत आहे. दरवर्षी शाहरुख त्याच्या अनेक कलाकार मित्रमंडळींना सामने पाहण्यासाठी आमंत्रित करतो. याशिवाय खेळाडूंना सपोर्ट करण्यासाठी तो स्वत: स्टेडियममध्ये उपस्थित असतो. यंदाच्या आयपीएलचा २८ वा सामना लखनौ विरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स या संघांमध्ये खेळवण्यात आला. या सामन्यात शाहरुखच्या केकेआर टीमने बाजी मारली. रविवारी पार पडलेल्या या सामन्याला शाहरुखची लेक सुहाना खान आणि बॉलीवूड अभिनेत्री अनन्या पांडे उपस्थित होती.सुहाना आणि अनन्या गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकींच्या घट्ट मैत्रिणी आहेत. त्यामुळे अनन्या पांडे आयपीएलच्या सुरुवातीपासूनच केकेआरच्या बहुतांश सामन्यांना हजेरी लावत आलीये. परंतु, यावेळी अभिनेत्रीने आयपीएल दरम्यानचा एक खास फोटो शेअर करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हा फोटो जुना असून तेव्हा नुकतीच IPL ची सुरुवात झाल्याचं या फोटोतून स्पष्ट होत आहे.अनन्याने शेअर केलेल्या जुन्या फोटोमध्ये सुहाना आणि अनन्या दोघीही लहान दिसत आहेत. याशिवाय या दोघींच्या बाजूला अभिनेता शाहरुख खान, हृतिक रोशन आणि अनन्याचे वडील चंकी पांडे पोज देत असल्याचं पाहायला मिळत आहे.

# नेहा धुपिया झाली अवाक



२२ मार्चपासून आयपीएलच्या हंगामाला सुरूवात झाली आणि प्रत्येक टीमने आपली जोरदार खेळी दाखवली. रविवारी १४ एप्रिलला आयपीएलचे तगडे संघ एकमेकांसमोर आले होते. मुंबई इंडियन्स विरुदध चेन्नई सुपर किंग्जसचा सामना काल भारताने पाहिला. या अटीतटीच्या सामन्यात शेवटपर्यंत कोण बाजी मारेल याचा नेम काही लागत नव्हता. परंतु चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सवर २० धावांनी विजय मिळवला. आयपीएल सामन्याला अनेक कलाकार उत्साहाने हजेरी लावतात. कालच्या सामन्याला नेहा धुपिया आणि तिचा पती अंगद बेदी, करिना कपूर खान तसेच जॉन अब्राहम यांनी हजेरी लावली होती. आज नेहाने तिच्या सोशल मीडियावर कालच्या सामन्याचे हायलाइट्स शेअर केले. यात नेहाने सामन्यातील काही फोटोज आणि व्हिडीओज शेअर केले आहेत. धोनीच्या सलग तीन षटकाराने सगळ्यांनाच अचंबित केलं पण नेहाचे हावभाव काही औरच होते. नेहा आवाक झाली होती. नेहाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय.नेहाच्या व्हायरल झालेल्या या व्हिडीओवर नेटकर्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एवढ तोंड कोण खोलतं?" असं एका नेटकर्याने लिहिलं." धोनीने षटकार मारल्यावर जी रिॲक्शन दिली ती खूप आवडली" असं दुसर्याने लिहिलं. "जॉन आणि करिनाने' जिंदगी खल्लास'सारखा पोज दिलाय." असं एकजण म्हणाला.काल संध्याकाळच्या सामन्यातील माझे स्वतःचे हायलाइट्स! खेळ आवडला.

# आमचा पोलिसांवर विश्वास; अरबाज

बॉलीवूडचा भाईजान सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर १४ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास गोळीबार झाला. दुचाकीवर आलेल्या दोघांनी गोळ्या झाडल्या. घरासमोरील सीसीटीव्ही फुटेजमधून या दोन हल्लेखोरांबद्दल माहिती कळली. हे सगळं केवळ प्रसिद्धीसाठी सुरू असल्याचं सलमान खानचे वडील सलीम खान यांनी म्हटलं अशा चर्चा सुरू होत्या. परंतु या हल्ल्यानंतर खान कुटुंबातील कोणत्याही सदस्याने याबद्दल भाष्य केलं नसल्याचं अरबाज खानने सांगितलं. अरबाज खानने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर याबाबत एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात अरबाजने लिहिलं, "मोटारसायकलवर असलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची घटना नुकतीच सलीम खान यांचं निवासस्थान असलेल्या गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये घडली. आमचे संपूर्ण कुटूंब यामुळे खूप अस्वस्थ आहे. या धक्कादायक घटनेने कुटुंबीय हादरले आहेत. दुर्दैवाने काही लोक अशी आहेत जी आमच्या कुटूंबाच्या अगदी जवळची आहेत असं भासवून माध्यमांसमोर विधान करतायत आणि हा एक पब्लीसिटी स्टंट आहे आणि यामुळे आम्हाला कोणताही त्रास झाला नाही असा दावा करतायत. या विधानांना गांभीर्याने घेतले जाऊ नये. "अरबाज खानने पुढे लिहिलं, "सलीम खान कुटूंबातील कोणत्याही सदस्याने या घटनेबाबत अधिकृत विधान किंवा माहिती अद्याप दिली नाही आहे. या वेळेस संपूर्ण कुटूंब या दुर्दैवी घटनेसाठी पोलिसांना तपासात सहकार्य करत आहे."आमचा मुंबई पोलिसांवर विश्वास आहे आणि आमच्या कुटुंबाच्या रक्षणासाठी आणि सुरक्षिततेसाठी ते त्यांच्या क्षमतेनुसार सर्व काही करतील, असे आश्वासन त्यांनी आम्हाला दिले आहे. तुमच्या प्रेमाबद्दल आणि पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार." असंही अरबाजने नमूद केलं.सलमान खानच्या घरावर झालेल्या हल्ल्यानंतर सुरक्षा वाढविण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबाबत सलमान खानशी संवाद साधला होता. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी रविवारी संध्याकाळी अभिनेत्याच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली. सध्या या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत.

# भूमी पेडणेकरला नेटकऱ्याने केले ट्रोल



बॉलीवूड अभिनेत्री भूमी पेडणेकर अभिनयासह तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही नेहमीच चर्चेत असते. भूमी व तिची बहीण समीक्षा अनेकदा एकत्र फिरताना दिसतात. दोघी त्यांच्या सोशल मीडियावर एकत्र फोटोज आणि व्हिडीओजही शेअर करीत असतात. अनेकदा त्या दोघी सारख्या दिसतात, असंही म्हटलं गेलंय. पण, त्यांच्या सारख्या दिसण्यावरून पेडणेकर बहिणींना ट्रोलिंगचा सामना करावा लागतोय. भूमी आणि समीक्षानं तीन दिवसांपूर्वी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला; ज्यात दोघी बहिणी एकत्र तयार होताना आणि दोघी कॅमेऱ्यासमोर एकत्र लिपस्टिक लावताना दिसतायत. 'मी आणि माझी जवळची मैत्रीण', अशी कॅप्शन समीक्षानं या व्हिडीओला दिली आहे. या व्हिडीओमुळे अनेकांनी पेडणेकर बहिणींना ट्रोल केलंय. या ट्रोलला समीक्षानं सडेतोड उत्तरही दिलंय. पेडणेकर बहिणींच्या या व्हिडीओवर एका नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं, "जेव्हा एकच सर्जन तुमची सर्जरी करतो, तेव्हा असं घडतं. आम्ही दोघांमधला फरक ओळखू शकत नाही." "एकच सर्जन की एकच पालक? कदाचित?", असं खणखणीत उत्तर समीक्षानं कमेंट करीत दिलं.लाइफ इन प्लॅस्टिक इट्स सो फॅनटॅस्टिक" बार्बी गाण्यातील हे कडवं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. त्यावर "काय प्लॅस्टिक?" असा प्रत्युत्तरादाखल प्रश्न समीक्षानं विचारला.तुम्ही दोघी जुळ्या आहात का?", "भूमीची बहीण अरबाज खानच्या बायकोसारखी दिसतेय." "यातली भूमी कोण आहे हेच कळत नाही." अशा प्रकारच्या अनेक कमेंट्स या व्हिडीओवर आल्या आहेत.दरम्यान, भूमी पेडणेकरची बहीण समीक्षा ही वकिल व उद्योजक आहे. भूमीच्या आगामी चित्रपटाबाबत सांगायचं झाल्यास, 'मेरे हजबंड की बीवी' चित्रपटात भूमी, अर्जुन कपूर व रकुल प्रीत सिंग हे प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होईल.बॉलीवूड अभिनेत्री भूमी पेडणेकर अभिनयासह तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही नेहमीच चर्चेत असते. भूमी व तिची बहीण समीक्षा अनेकदा एकत्र फिरताना दिसतात. दोघी त्यांच्या सोशल मीडियावर एकत्र फोटोज आणि व्हिडीओजही शेअर करीत असतात. अनेकदा त्या दोघी सारख्या दिसतात, असंही म्हटलं गेलंय. पण, त्यांच्या सारख्या दिसण्यावरून पेडणेकर बहिणींना ट्रोलिंगचा सामना करावा लागतोय. भूमी आणि समीक्षानं तीन दिवसांपूर्वी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला.

# रोहित शर्मासह कोण सलामी देणार?

## आम्ही तिन्ही पर्याय पाहूनच संघ निवडू : राहुल द्रविड

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय संघ बुधवारी आयर्लंडविरुद्धच्या सामन्याने टी-२० विश्वचषकात आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. बांगलादेशविरुद्धच्या सराव सामन्यात भारताने यशस्वी जयस्वालच्या जागी रोहित शर्मासोबत सलामीसाठी संजू सॅमसनला मैदानात उतरवले होते. तेव्हापासून या स्पर्धेत भारत आपल्या टॉप ऑर्डरमध्ये बदल करणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. या सामन्यापूर्वी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनीही याबाबत मौन सोडले, परंतु त्यांनी आपले पत्ते उघड करण्यास स्पष्टपणे नकार दिला.**



बांगलादेशविरुद्धच्या सामन्यादरम्यान रोहित शर्मासोबत संजू सॅमसन सलामीवीर म्हणून आला होता. सहसा यशस्वी जैस्वाल सलामीवीर म्हणून खेळतो, पण सराव सामन्यादरम्यान यशस्वीला संधी मिळाली नाही. संजू सॅमसनला संधी मिळाली, पण त्याला या संधीचा फायदा घेता आला नाही आणि तो सहा चेंडूंत एक धाव काढून बाद झाला. विराट कोहलीही बांगलादेशविरुद्ध खेळला नव्हता.टीम इंडियाकडे अनेक पर्याय आहेत आणि संघ व्यवस्थापन परिस्थितीचा विचार करूनच संयोजनाबाबत निर्णय घेईल, असे द्रविड यांनी सांगितले. राहुल द्रविड म्हणाले, “आमच्याकडे पर्याय आहेत. त्यामुळे आम्ही सध्या आमचे पत्ते उघडत करत नाही. आमच्याकडे रोहित, यशस्वी आणि कोहली देखील उपलब्ध आहेत ज्यांनी आयपीएलमध्ये ओपनिंग म्हणून सुरुवात केली आहे. आम्ही तिन्ही पर्याय पाहूनच संघ निवडू आणि परिस्थिती पाहूनच निर्णय घेऊ.”रोहित शर्मा आणि विराट कोहली ओपनिंग म्हणून उतरले तर यशस्वी जैस्वालची भूमिका काय असणार? त्याला तिसऱ्या क्रमांकावर संधी दिली जाणार की तो प्लेइंग इलेव्हनचा भाग असणार नाही? हा असा प्रश्न आहे, ज्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आयपीएल २०२४ मध्ये यशस्वीची कामगिरी खूपच निराशाजनक होती, तर दुसरीकडे कार अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर परतलेल्या पंतने आयपीएलमधील कामगिरीने प्रभावित केले.बांगलादेशविरुद्धच्या सामन्यादरम्यान रोहित शर्मासोबत संजू सॅमसन सलामीवीर म्हणून आला होता. सहसा यशस्वी जैस्वाल सलामीवीर म्हणून खेळतो, पण सराव सामन्यादरम्यान यशस्वीला संधी मिळाली नाही. संजू सॅमसनला संधी मिळाली, पण त्याला या संधीचा फायदा घेता आला नाही आणि तो सहा चेंडूंत एक धाव काढून बाद झाला. विराट कोहलीही बांगलादेशविरुद्ध खेळला नव्हता.टीम इंडियाकडे अनेक पर्याय आहेत आणि संघ व्यवस्थापन परिस्थितीचा विचार करूनच संयोजनाबाबत निर्णय घेईल, असे द्रविड यांनी सांगितले. राहुल द्रविड म्हणाले, “आमच्याकडे पर्याय आहेत. त्यामुळे आम्ही सध्या आमचे पत्ते उघडत करत नाही. आमच्याकडे रोहित, यशस्वी आणि कोहली देखील उपलब्ध आहेत ज्यांनी आयपीएलमध्ये ओपनिंग म्हणून सुरुवात केली आहे. आम्ही तिन्ही पर्याय पाहूनच संघ निवडू आणि परिस्थिती पाहूनच निर्णय घेऊ.”रोहित शर्मा आणि विराट कोहली ओपनिंग म्हणून उतरले तर यशस्वी जैस्वालची भूमिका काय असणार? त्याला तिसऱ्या क्रमांकावर संधी दिली जाणार की तो प्लेइंग इलेव्हनचा भाग असणार नाही? हा असा प्रश्न आहे.

### यशस्वी आणि कोहली उपलब्ध

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यादरम्यान रोहित शर्मासोबत संजू सॅमसन सलामीवीर म्हणून आला होता. सहसा यशस्वी जैस्वाल सलामीवीर म्हणून खेळतो, पण सराव सामन्यादरम्यान यशस्वीला संधी मिळाली नाही. संजू सॅमसनला संधी मिळाली, पण त्याला या संधीचा फायदा घेता आला नाही आणि तो सहा चेंडूंत एक धाव काढून बाद झाला. विराट कोहलीही बांगलादेशविरुद्ध खेळला नव्हता.टीम इंडियाकडे अनेक पर्याय आहेत आणि संघ व्यवस्थापन परिस्थितीचा विचार करूनच संयोजनाबाबत निर्णय घेईल, असे द्रविड यांनी सांगितले. राहुल द्रविड म्हणाले, “आमच्याकडे पर्याय आहेत. त्यामुळे आम्ही सध्या आमचे पत्ते उघडत करत नाही. आमच्याकडे रोहित, यशस्वी आणि कोहली देखील उपलब्ध आहेत.

# अफगाणिस्तानने उडवला युगांडाचा धुव्वा

## अफगाणिस्तानने युगांडाचा 125 धावांनी केला पराभव

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ च्या पाचव्या सामन्यात अफगाणिस्तानने युगांडाचा १२५ धावांनी पराभव केला. अफगाणिस्तानसाठी हा मोठा विजय होता. या सामन्यात रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी अफगाणिस्तानसाठी फलंदाजी आणि नंतर गोलंदाजीमध्ये आश्चर्यकारक कामगिरी केली, फजल हक फारुकीने ५ विकेट्स घेत युगांडाच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. अफगाणिस्तानच्या १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युगांडा अवघ्या ५८ धावांत सर्वबाद झाला.**




गयानाच्या प्रोव्हिडन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात युगांडाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो त्यांच्यासाठी अजिबात चांगला ठरला नाही. प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलेल्या अफगाणिस्तानने २० षटकांत ५ बाद १८३ धावा केल्या होत्या. रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी पहिल्या विकेटसाठी १५४ (८८ चेंडू) धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर युगांडाच्या गोलंदाजांनी दमदार पुनरागमन केले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता.१४ षटकांपर्यंत भरघोस धावा देणाऱ्या युगांडाच्या गोलंदाजांनी शेवटच्या ६ षटकांत शानदार पुनरागमन करत अफगाणिस्तानला बॅकफूटवर ढकलले. या ६ षटकांत अफगाणिस्तानच्या फलंदाजांना एकही चौकार मारता आला नाही. मात्र युगांडाचे फलंदाज संघाला फारशी साथ देऊ शकले नाहीत. १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युगांडाचा संघ १६ षटकांत ५८ धावांवर सर्वबाद झाला. रॉबिन्सन ओबुयाने संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळली.

### फारुकीने घेतल्या 5 विकेट्स

त्याने एका षटकाराच्या मदतीने १४ धावा केल्या.युगांडाच्या ११ फलंदाजांपैकी फक्त २ फलंदाज दुहेरी आकडा पार करू शकले. पहिल्याच षटकापासून संघाने विकेट्स गमावण्यास सुरुवात केली. पहिल्याच षटकात फजलहक फारुकीने रौनक पटेल (४) आणि रॉजर मुकासा (०) यांना सलग दोन चेंडूंवर पॅव्हेलियनमध्ये पाठवल्यामुळे संघाला पहिले दोन धक्के बसले. त्यानंतर दुसऱ्या षटकात सायमन सेसाझीच्या (४) रूपाने संघाने तिसरी विकेट गमावली. यानंतर संघाने पाचव्या षटकात दिनेश नाक्राणीच्या (६) रूपाने चौथी विकेट गमावली. त्यानंतर त्याच षटकात खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतलेल्या अल्पेश रामजानीच्या रूपाने संघाला पाचवा धक्का बसला. अफगाणिस्तानकडून फजल हक फारुकीने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या. यादरम्यान त्याने ४ षटकात केवळ ९ धावा दिल्या. नवीन उल हक आणि कर्णधार राशिद खान यांना प्रत्येकी २ विकेट्स मिळाल्या. नवीनने २ षटकांत ४ धावा आणि रशीदने ४ षटकांत १२ धावा दिल्या.